तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १८ डिसेंबर २०२४

आतील पानावर

पान २ – 'हायवे' साठी 'ही' अभिनेत्री होती...
पान ३ – अजय देवगणच्या 'रेड २'ची ...
पान ४ – वलयांकितांच्या सहवासात उस्ताद ...
पान ६ – श्रुती मराठेची बॉलीवूडमध्ये एन्ट्री
पान ७ – शिवरायांवरील बिग बजेट चित्रपटात...

# भारतीय गुरु-शिष्य परंपरेचा 'सर'ताज!

उस्ताद झाकीर हुसैन आणि एकूणच त्यांचं घराणं मग उस्तादजी स्वतः असोत की त्यांचे बंधु तौफीकजी असो किंवा त्याआधी त्यांचे पिताश्री स्व. उस्ताद अल्ला रखा असोत कलासक्त आणि सरस्वतीचे खरे उपासक अशी कुठल्या घराण्याला पदवी द्यायचीच झाली तर उस्तादजींच्या घराण्याला देता येईल. कलाकार हा सरस्वतीचा उपासक असावा अशी अपेक्षा असते. प्रत्येक कलाकार सरस्वतीचा उपासकच असतो असं नाही, कलाकारांच्या मांदीयाळीत निवडक कलाकार तसे असतात! पण ज्यांच्या कलेने 'निर्वाणा'ची प्राप्ती होते असे फार फार थोडे कलाकार असतात. लताबाई, किशोरीताई, रविशंकर, भीमसेनजी, हरिप्रसादजी, झाकीर हुसैन, ही त्यातली मोजकी अग्रगणी नावं.

**श्रध्दांजली...**

**प्रसाद देशपांडे**

**स्वा**तंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय कलाविश्वात एक प्रकारचा 'रेनिसान्स' सुरु झाला होता. अल्काजी, रविशंकर, किशोरीताई, कुमार गंधर्व, विजया मेहता, पु.ल. देशपांडे, काही प्रमाणात तेंडुलकर ह्यांची पिढी त्याची प्रवर्तक होती, त्याला पुढे नेण्याचं काम झाकीर हुसैन ह्यांच्या पिढीने केलं. 'रेनिसान्स' ची पार्श्वभूमी युरोपियन असली तरीही त्यामागची भावना भारताच्या तत्कालीन सामाजिक संरचनेशी मिळती जुळती होती. त्याचा कुठेतरी प्रभाव उस्ताद-जींवर झाला असावा. पण उस्तादजींची नाळ भारतीय संस्कृतीशी इतकी घट्ट होती की ह्या रेनिसान्सच्या प्रभावाने देखील त्यांच्यातले अस्सल भारतीय संस्कार कधीही पुसले गेले नाहीत. ते गुरु-शिष्य परंपरेचे आग्रही समर्थक होते.

दहा वर्षांपूर्वी एनसीपीएमध्ये त्यांची एक सुंदर मुलाखत झाली होती. 'गुरु-शिष्य परंपरा' ह्या विषयावर झालेली दीड पावणेदोन तासांची मस्त मुलाखत. त्यात ज्या काही गोष्टी उस्तादजींनी मांडल्या. त्या अस्सल भारतीय संस्कृतीशी नाळ जुळली असल्याशिवाय बोलताच यायच्या नाहीत.

उस्तादजी म्हणत 'गुरु-शिष्य' ठरवून होता येत नाही. 'नियती'ने आधीच लिहून ठेवलं असतं. अन्यथा भगवंताने अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला घातलेल्या 'अल्ला रखा' ह्यांना उपजत जन्मजात कला आणि त्या कलेचं स्वरूप शोधण्याची भूक दिलीच नसती. ती भूकच होती की त्यांना वयाच्या एकराव्या वर्षी घर सोडून त्यांच्या गुरूच्या 'मियाँ कादर बक्श' ह्यांच्या शोधात घराबाहेर घेऊन आली, आणि कुठलीही ओळख नसतांना त्यांना 'गुरु-शिष्य' परंपरेत अडकवून गेली.

उस्तादजी तसे अर्जुनाच्या कुळातले. त्यांचे वडील उस्ताद अल्ला रखा पटियाला-पंजाब घराण्याचे. त्यामुळे झाकीर ह्यांच्यावर संस्कार झालेत ते पटियाला-पंजाब घराण्याचेच तरीही ते कधीही फक्त त्यापूरते सीमित राहिले नाहीत. त्यांनी किराणा, लखनवी, जयपूर, दिल्ली, वाराणसी, अशा हिंदुस्थानी शास्त्रीय, घराण्यातील गायकांना, तसेच कर्नाटकी शास्त्रीय घराण्यातील अनेक दिग्गज कलाकारांना तबल्यावर साथ दिली. उस्तादजींच्याच भाषेत सांगायचं तर तबलजीसाठी कुठलीही मैफिल ही केदारनाथ/वैष्णवदेवी तीर्थयात्रेसारखी असते. त्यात तबलजी हा पालखीवाल्याच्या भूमिकेत असतो तर गायक हा पालखीत बसलेल्या यात्रेकरूच्या. ह्यात तबलजीरूपी पालखीवाल्यासाठी योग्य रस्ता असतो 'तीन ताल' आणि गंतव्य स्थान असतो 'राग भूप, दरबारी' इत्यादी! उस्तादजींचं श्रेष्ठत्व ह्या भावनेत आहे. उस्तादजींनी फक्त भारतीय शास्त्रीय उपशास्त्रीय कलाकारांबरोबरच काम केलं असं नाही तर असंख्य पाश्चिमात्य कलाकारांबरोबर जसे की जॉन मॅकलोघलिन, डेव्ह हॉलंड, मार्कस गिल्मोर, सॅक्सोफोन वादक चार्ल्स लॉईड, बेंजो प्लेयर बेला फळं फ्लेक अशी असंख्य नाव घेता येतील.

उस्तादजींची अजून एक खासियत होती की त्यांना 'उस्ताद' ह्या शब्दांवर आक्षेप होता. त्यांचं म्हणणं होतं प्रत्येक वाद्याला स्वतःचं असं एक 'स्पिरीट' असतं. ते शोधायला कुठल्याही कलाकाराला त्याच्या आयुष्याची पहिली कमीतकमी १५-२० वर्ष द्यावी लागतात. नंतर तो कलाकार आणि त्याचं वाद्य हे एकजीव होतं. उद्या कलाकाराला त्याच्या वाद्याने साथ द्यायला नकार दिला तर कलाकार असहाय होऊन जाईल. मी काही त्यातून वेगळा नाही. भारतीय गुरु-शिष्य परंपरेचे, भारतीय संस्कृतीचे प्रवर्तक, आणि प्रचारक उस्तादजी. माझी पिढी भाग्यवान आहे ज्यांना उस्तादजींना बघता आलं आणि त्यांच्या कलेमुळे 'निर्वाणा'ची अनुभूती घेता आली. त्यांच्या आत्मास परमेश्वर शांती देवो, हीच प्रार्थना!





# ‘हायवे’साठी ‘ही’ अभिनेत्री होती पहिली पसंती

आपल्या सिनेविश्वात एखादा चित्रपट बनवताना त्यामागे बरीच मेहनत घेतली जाते. दिग्दर्शक आणि निर्मात्यांना चित्रपटातील एखादे पात्र उत्तमरीत्या साकारलं जावं यासाठी त्यांना हवा तसा कलाकार शोधताना तारे-वरची कसरत करावी लागते. त्यासाठी बर्याच ऑडिशन घेतल्या जातात आणि त्यामध्ये कलाकारांना त्यांच्या कामाचं कसब दाखवावं लागतं. बॉलीवूडमधील अभिनेत्री आलिया भट्टचा ‘हायवे’ चित्रपट पाहिला असेल. या चित्रपटात आलियाने दमदार अभिनय केला आहे.या चित्रपटातील तिच्या अभिनयाचं सर्वत्र कौतुक झालं. मात्र, तुम्हाला माहितीये का? इम्तियाज अली यांची या चित्रपटासाठी पहिली पसंती आलिया नाही, तर ऐश्वर्य बच्चनला होती. ‘हायवे’साठी मुख्य भूमिकेत आलिया नाही, तर अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चनला दिग्दर्शकांनी पहिली पसंती दिली होती. पण मग, आलियाची निवड कशी झाली याची माहिती जाणून घेऊ.

माहितीनुसार, इम्तियाज अली यांनी एका मुलाखतीमध्ये याचा खुलासा केला होता. चित्रपटातील वीरा त्रिपाठी हे पात्र साकारण्यासाठी त्यांना एक मध्यमवयीन अभिनेत्री हवी होती. चित्रपटात दाखवल्या जाणार्या सर्व गोष्टी जी सहजपणे करू शकेल अशी त्यांना अपेक्षित वयातील अभिनेत्रीच्या शोधात ते असताना त्यांच्या डोक्यात ऐश्वर्या राय-बच्चन होती.

मुलाखातीमध्ये इम्तियाज अली यांनी सांगितलं, मी या पात्रासाठी वयाने थोडी मोठी असलेली अभिनेत्री शोधत होतो. मला कमीत कमी ३० वर्षे वय असलेली महिला या पात्रासाठी हवी होती. त्यामुळे या पात्रासाठी चेहर्यावर कोणताही मेकअप न करता, ऐश्वर्या राय-बच्चन एक उत्तम पर्याय होती. इम्तियाज अली हे आलिया भट्टला ‘लव शव ते चिकन खुराना’ चित्रपटाच्या स्क्रीनिंगच्या वेळी भेटले होते. त्यावेळी त्यांनी आलियाबरोबर वार्तालाप केला.

इम्तियाज अली म्हणाले, माझी भावनात्मक स्थिती उत्तम होती आणि अचानक मला आलियाशी संवाद साधण्याची इच्छा झाली. त्यानंतर मी तिला स्क्रिप्ट दिली आणि चित्रपटाची कथा तुझ्या भाषेत सांग, असं सांगितलं. आलियानं सांगितलेली स्टोरी ऐकल्यानंतर तीच हे पात्र फार छान पद्धतीनं साकारू शकेल, असं आम्हाला वाटलं. आलियाला मुख्य भूमिका देण्याचा विचार सुरू असताना संपूर्ण युनिटला आलिया हे करू शकणार नाही, असं वाटत होतं. मात्र, तिनं तिच्या पद्धतीनं या चित्रपटाची कथा सांगितल्यावर सर्वांचा विचार बदलला आणि आलियाला ‘हायवे’मध्ये मुख्य भूमिका साकारण्याची संधी मिळाली.



# सिल्क स्मितावर येणार बायोपिक




साऊथ सिनेमात बोल्ड भूमिकांमुळे चर्चेत असलेली अभिनेत्री सिल्क स्मिताच्या आयुष्यावर आधारित एका सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. हा तिचा बायोपिक असणार आहे. यापूर्वी ‘द डर्टी पिक्चर’ हा चित्रपट सिल्क स्मिताच्या आयुष्यावर होता. ज्यात विद्या बालन मुख्य भूमिकेत होती. तर नसीरुद्दीन शाह, इमरान हाश्मी, तुषार कपूर यांच्या प्रमुख भूमिका होत्या. २०११ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला होता.

डिसेंबरमध्ये साउथ फिल्म इंडस्ट्रीची क्वीन सिल्क स्मिताच्या जयंतीला अभिनेत्रीच्या आयुष्यावर आधारीत बायोपिक फिल्मची घोषणा करण्यात आली. अभिनेत्री चंद्रिका रावने या बायोपिकचा टीझर शेअर केला. सुरुवातीला तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधींकडे मॅगझीन आणि वृत्तपत्र येतात. त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी सिल्क स्मिताच्या बातम्या आलेल्या असतात. इंदिराजी पीएला ही कोण आहे असं विचारतात? तेव्हा पीए म्हणतो, तुम्ही आयर्न लेडी आहात तर ही मॅग्रेटिक लेडी आहे. पुढे एका गाडीतून उतरत सिल्क स्मिता प्रवेश करताना दिसते. स्मिताच्या बोल्ड अदा पाहून सर्वच घायाळ होतात. शेवटी स्मितावर झालेले आरोप आणि तिला मिळालेल्या प्रसिद्धीची झलक दिसते. पोस्टरमध्ये अभिनेत्री चंद्रिका रावचा अभिनय आणि लूक हुबेहुब सिल्क स्मितासारखा झालेला दिसतोय. हा सिनेमा लवकरच थिएटरमध्ये रिलीज होईल. सिल्क स्मिताचा जन्म एलुरु (आंध्र प्रदेश) येथे झाला. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आपल्या १७ वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये पाच भाषांमध्ये ४५० चित्रपट केले होते. त्यांचे खरे नाव विजयालक्ष्मी विदलपती होते. त्याच वेळी तिचे स्टेजचे नाव सिल्क स्मिता झाले.

# मुन्ना भैय्याची साऊथ सिनेमात एन्ट्री

बॉलिवूड अभिनेता दिव्येंदू शर्माने प्राइम व्हिडिओच्या ‘मिर्झापूर’ या वेबसीरिजमध्ये मुन्ना भैय्याची भूमिका साकारली होती. त्याचे हे पात्र खुप प्रसिद्ध झाले. आजही तो मुन्ना भैय्या या व्यक्तिरेखामुळेच अधिक करून ओळखला जातो. आता त्याच्या चाहत्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. तो एका मोठ्या साऊथ चित्रपटात पाहायला मिळणार आहे. मुन्ना भैय्या तेलुगू चित्रपटात डेब्यू करणार आहे. मुन्ना भैय्यासोबत यात राम चरण मुख्य भूमिकेत दिसणार आहे. खरं तर या चित्रपटाचे शीर्षक अद्याप निश्चित झालेले नाही, त्यामुळे याला "RC 16' म्हटले जात आहे, म्हणजेच हा राम चरणचा १६ वा चित्रपट आहे. त्यासोबतच या चित्रपटात अभिनेत्री जान्हवी कपूर देखील दिसणार आहे. RC16'चे दिग्दर्शक बुची बाबू यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एक पोस्ट शेअर करून दिव्येंदू शर्माच्या चित्रपटातील एन्ट्रीची घोषणा केली आहे. त्याने दिव्येंदुचा फर्स्ट लूक देखील ट्विटर शेअर केला आहे. त्याचा या चित्रपटातील लूक खूपच खतरनाक दिसत आहे. बुची बाबू यांनी ही पोस्ट शेअर करताना कॅप्शनमध्ये म्हटलं आहे की, ‘आमचा भाऊ, तुझा भाऊ, मुन्ना भैय्या. स्वागत दिव्येंदु भाई. चला रॉक करूया.

"RC16' या चित्रपटात दिव्येंदु शर्मा कोणती भूमिका साकारणार आहे, याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दिव्येंदूला राम चरणसोबत ऑनस्क्रीन पाहणे खूप मनोरंजक असणार आहे. नुकतेच एका छोट्या भागाचे शूटिंग पूर्ण झाले आणि त्यानंतर पुढील शेड्यूलचे शूटिंग लवकरच हैदराबादमध्ये सुरू होणार आहे. जगपती बाबू देखील या चित्रपटाचा एक भाग आहे. या चित्रपटाचे लेखन सुकुमार यांनी केले आहे. मात्र, आता या चित्रपटात दिव्येंदू कोणत्या भूमिकेत दिसणार हे पहावे लागणार आहे.



# लोभस व्यक्तीमत्त्वाचा विनयी आणि साधा माणूस

**जसराज पूर्वी तबला वाजवत असल्यामुळे असेल, पण त्यांची आणि झाकीर हुसेन यांची दोस्ती असावी. कारण IIT मध्ये असताना बरेचदा आम्ही संगितवेडे पीर पंडित जसराजांकडे जायचो तेव्हा तोही तिथे असायचा. मग खूप गप्पा रंगायच्या. (झाकीर माझ्यापेक्षा १ वर्षांनी लहान. म्हणजे त्यावेळी तो १९-२० वर्षांचा असावा.) झाकीर हुसेन हा इतका गोड आणि लोभस व्यक्तिमत्वाचा, विनयी आणि साधा होता की तो पटकन आमच्यात मिसळून जायचा. त्याला आता आठवणारही नाही पण एकदा तर मी आणि तो जसराजांकडून निघालो आणि खालीच असलेल्या इराण्याच्या हॉटेलमध्ये 'पानी कम चहा' पिऊन समुद्रावर फिरायलाही गेलो होतो.**

श्रध्दांजली...

अच्युत गोडबोले



मुसाफिरलाही आता १२-१३ वर्ष होऊन गेली. त्यानंतर त्याचे अनेक कार्यक्रम मी ऐकले. तोच तो गोड चेहरा, उडणारी झुल्फे, समेवर आल्यावर लोकांचा टाळ्यांचा कडकडाट अजून कानात घुमतोय. त्याचा परफॉर्मन्स नुसता श्रवणीय नसायचा तर खूप देखणाही असायचा. त्याच्या कार्यक्रमांना आलेली तुडुंब गर्दी चक्क पागल झालेली मी पाहिली आहे.

नंतरच्या काळात मी इन्फॉर्मशन टेकनॉलॉजी मध्ये बरीच वर्ष काम केल्यावर पूर्णवेळ मराठीत लिखाण चालू केलं होतं. पण हे त्याला माहित असण्याचं कारणच नव्हतं. कारण तो त्याच्या दुनियेतला अनभिशिक्त बादशाह झाला होता! त्याला सगळं जग ओळखत होतं! पण तरीही एकदा मेहेफील झाल्यावर मी धैर्य एकवटून त्याला पूर्वीची आठवण करून दिली तेव्हा तर त्यानं प्रेमानं हात हातात घेतला आणि बराच वेळ सोडलाच नाही. तेव्हाचा त्याचा तोच निरागस चेहरा मला पुन्हा दिसला होता. नाहीतर कोण होतो मी त्याच्यापुढे!!! थोडंसं यश मिळाल्यावर खूप अरेरावीनं वागणारे मी अनेक बघितले आहेत. पण झाकीर त्यातला नव्हता. तो आता नाही यावर विश्वासही बसत नाहीये.

आता फक्त आठवणीच! आता मात्र आपलं आयुष्य पुन्हा समेवर येणं अवघडच! (गोडबोले यांच्या मुसाफिर या आत्मचरित्रातून...)

# अजय देवगणच्या 'रेड २'ची प्रतिक्षा संपली




बॉलिवूडच अभिनेता अजय देवगणच्या 'रेड' चित्रपटाच्या सिक्केलची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. यापूर्वी 'रेड २' या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये रिलीज होणार होता. मात्र, निर्मात्यांनी विविध कारणांमुळे चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. पण आता अजय देवगण रेड २ चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे.

अजय देवगणने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर 'रेड २'चे पोस्टर शेअर केले आहे. यासोबत त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, 'आयआरएस अमेय पटनायकचे पुढील मिशन मे २०२५ पासून सुरू होत आहे! 'रेड २२ १ मे २०२५ रोजी रिलीज होणार आहे.' पॅनोरमा स्टुडिओजच्या बॅनरखाली 'रेड २' चे दिग्दर्शन राज कुमार गुप्ता यांनी केले आहे. या चित्रपटाची निर्मिती भूषण कुमार, कृष्ण कुमार, कुमार मंगत पाठक आणि अभिषेक पाठक यांनी केली आहे. यात अजय देवगण पुन्हा एकदा IRS अमेय पटनायकच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात वाणी कपूर आणि रितेश देशमुखही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

'रेड २' हा सिनेमा १  मे २०२५ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार असल्याने आता चाहत्यांचीही प्रतिक्षा संपली आहे. अजय देवगनचा 'रेड' हा सिनेमा २०१८ मध्ये रिलीज झाला होता. त्यावेळी हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला होता. तेव्हापासून चाहते या सिनेमाच्या सीक्केलची प्रतीक्षा करत होते.

अखेर 'रेड २' प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज होणार आहे.

अजय देवगणच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, तो शेवटचा 'सिंघम अगेन' या चित्रपटात दिसला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फार कमाल दाखवू शकला नाही. याशिवाय पुतण्या अमन देवगणच्या 'आझाद' या डेब्यू चित्रपटात तो दिसणार आहे. हा चित्रपट १७ जानेवारी २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. याशिवाय अजय देवगण 'गोलमाल ५', 'शैतान २', 'दे दे प्यार दे २' आणि 'सन ऑफ द सरदार २' या चित्रपटांमध्येही पाहायला मिळणार आहे.



# वलयांकितांच्या सहवासात

# उस्ताद झाकीर हुसेन

**मला आठवतं तेव्हापासून त्याला मी, झाकीरकाका असं म्हणत आलोय. कारण तो माझ्या सगळ्यात धाकट्या काकाचा- रवीकाकाचा खास दोस्त. त्याला पहिल्यांदा पाहिला तो वयाच्या तिसऱ्या वर्षी. १९६९ साली. संध्याकाळी डेक्कन क्वीननं रवीकाका व अरुणकाका मुळे त्याला घेऊन आमच्याकडे कर्जतला आले होते. आमचा ८० वर्षांचा जुना वाडा होता. ते तिघं अचानक आले होते. पण आजीनं त्याला वाड्याच्या बाहेर उभं केलं. त्याच्यावरून भाकरतुकडा ओवाळून टाकला, पायावर दूध-पाणी घातलं आणि मग त्याला आत येऊन दिलं होतं. आमच्या बाजारपेठेच्या नाकावर कामतांचं वड्याचं दुकान होतं. रवीकाकाला त्यानं सांगितलं, यार कर्जतका वडापाव खिलाओ. रवीकाकानं कामतांच्या हॉटेलातला वडापाव मागवला आणि त्यानं चवीनं वडा-पाव व सोबत तिखट मिर्ची खाल्ली. मला आठवतं त्याप्रमाणे, झाकीरकाका नंतर घरभर फिरला, मागे विहिरीवर गेला. विहिरीचं पाणी स्वत: शेंदून काढलं, त्यानं हातपाय धुतले. गोठ्यातल्या म्हशीचं ताजं दूध मधुकाकांनी काढलेलं, त्यांच्यासमोर हातात ग्लास धरून उभा राहिला व थेट तसंच ते दूध प्यायलं. त्यावेळी मला ह्या साध्या गोष्टींचं महत्त्व कळलं नव्हतं. पण आज या लेखाच्या निमित्तानं आठवणींचा गोफ उलगडत असताना, त्यावेळपर्यंत आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळवलेल्या त्या माणसाचं साधंपण सर्वप्रथम लक्षात आलं.**

आठवणी...
**डॉ. नीतिन दत्तात्रेय आरेकर**
भ्र. ८८० ५५५ ००८८

रवीकाकानं कामतांच्या हॉटेलातला वडापाव मागवला आणि त्यानं चवीनं वडा-पाव व सोबत तिखट मिर्ची खाल्ली. त्या रात्री रवीकाका, अरूणकाका त्याला घेऊन जवळच असलेल्या प्रभा आत्याच्या घरी गेले. तिच्या घरच्या दिवाणखान्यात हे सारी रात्र गाणं बजावणं करत बसले होते. नंतर कधी तरी आठवणी जागवताना रवीकाका म्हणाला त्या रात्री प्रभाआत्याच्या घरी गजाननबुवा पाटील, लीलाताई दिवाडकर, प्रभा आत्या, कल्पनाआत्या कुलकर्णी असे सारे गायले, शांताराम जाधव हार्मोनियमवर होते, मारुतीकाका टाळ घेऊन साथीला होते. त्या दिवशी गजाननबुवांची गायकी ऐकून झाकीरकाका त्यांना म्हणाला होता, आप तो भजन के गोपीकृष्ण हो बाकी सारी मंडळी हौशी होती. पण, झाकीरकाकाला तो कोणाबरोबर तबला वाजवतो, यात फारसा रस नव्हता. तो तबल्याचा आनंद घेत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी डेक्कन एक्स्प्रेसने तो सवाई गंधर्व सोहळ्यात तबला सोलो सादर करायला गेला. तो त्याचा सवाई गंधर्व सोहळ्यामधला पहिला कार्यक्रम होता. त्यानंतर झाकीरकाका कर्जतला रवीकाकाच्या सांगण्यावरून १९७१, ७२, ७३ आणि नंतर १९७५ साली आला. त्या प्रत्येक वेळी त्याच्यातला साधेपणा मनात घर करून गेला. कोणताही झब्बा पायजमा घालायचा आणि तबला वाजवायचा. कपड्यांपेक्षा त्याचं संगीताकडे अधिक लक्ष असायचं. आणि तो इतका देखणा आहे की त्याला काहीही साजून दिसतं.

झाकीरकाकाची एक सवय आहे. तो तुमची ओळख झाल्यानंतर व नंतर जवळचा परिचय झाल्यानंतर तुम्हाला एखादं टोपणनाव देतो. मला लहानपणापासून ज्या टोपणनावानं सारे हाक मारत तेच टोपणनाव तो आजही वापरतो. त्याच्याशी परका माणूस जरी बोलला तरी त्या व्यक्तीला तो परकेपणाची जाणीव कधी करून देत नाही. त्याने मराठीत मुलाखती दिल्या पण शब्दांकन दिलं नाही. 'ऋतुरंग'च्या अरुण शेवते यांनी मला सांगितलं की २००९ च्या दिवाळी अंकासाठी तुम्ही उस्तादजींच्या जडणघडणीविषयी त्यांची मुलाखत घ्या व तिचं शब्दांकन करता येईल का ते बघा. माझं ते पहिलं शब्दांकन असणार होतं. मी रवीकाकाला सांगितलं, निर्मला बाछानी म्हणून झाकीरकाकाच्या सचिव आहेत, त्यांना सांगितलं आणि झाकीरकाका मुलाखतीला तयार झाला. शब्दांकनकार होण्यासाठी मला पहिला आशीर्वाद मिळाला तो उस्ताद झाकीर हुसेन यांचा.

१९८७ च्या सुमारास दर रविवारी दुपारी सिद्धार्थ बसूचा एक 'क्वीझ टाईम' नावाचा शो असायचा. त्या क्वीझ शोमध्ये झाकीरकाका एकदा गेस्ट म्हणून गेला. मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होतो. त्या शो मध्ये सिद्धार्थ बसूने त्याला प्रश्न विचारला, तू जगभर फिरलास. आता तुला भारतीय संस्कृती आणि पाश्चिमात्य संस्कृती यातला कोणता भेद सांगता येईल. त्यानं दिलेलं उत्तर आजही काळजावर कोरलं गेलं आहे. तो म्हणाला, मी जेव्हा पाश्चिमात्य संगीतकारांना भेटतो, तेव्हा त्यांना हस्तांदोलन करून हॅलो माईक, हॅलो मार्क असं म्हणतो. पण जेव्हा मी पं. रवी शंकरजी, पं. शिवकुमार शर्माजी, पं. हरिप्रसाद चौरसिया, अशा दिग्गजांना भेटतो, तेव्हा त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करतो. दुसऱ्या बरोबरीच्या वयाच्या लोकांना भेटतो, तेव्हा दोन्ही हात जोडून ते जोडलेले हात हृदयाशी नेतो व मान झुकवून नमस्कार करतो आणि वयानं लहान असलेल्यांना हृदयाशी धरतो. ही माझी भारतीय संस्कृती आहे, ज्येष्ठांना मान देणारी आणि कनिष्ठांविषयी प्रेम व्यक्त करणारी. मला याचा अनुभव आहे.

तीन वर्षांपूर्वी अब्बाजींच्या, उस्ताद अल्लारखांसाहेबांच्या, बरसीला पद्मविभूषण बेगम परवीन सुलताना यांचं गाणं त्यानं आयोजित केलं होतं. त्यावेळी पहाटे पहाटे मी व रवीकाका षण्मुखानंद सभागृहात पोहोचलो होतो. परवीनजींचं गाणं सुरू व्हायचं होतं. त्यापूर्वी ड्रेसिंगरूममध्ये बरेचजण जमले होते. परवीनदीदी सोफ्यावर बसल्या होत्या. त्यांच्या बाजूला अन्य ज्येष्ठ संगीततज्ज्ञ बसले होते. पहिला कार्यक्रम सुरू करून देऊन झाकीरकाका त्या ड्रेसिंगरूममध्ये आला, आणि परवीनदीदींच्या जवळ खाली जमिनीवर जाजम अंथरलं होतं त्यावर बसला. त्याला कोणी तरी बाजूच्या खुर्चीवर बसायचा आग्रह केला. तेव्हा तो हळूवारपणे म्हणाला, परवीनजी ज्येष्ठ आहेत, त्यांच्याबाजूला बसणं योग्य होणार नाही. नंतर आम्ही उस्ताद आमीरखांसाहेबांच्या बरसीला एन.सी.पी.ए.ला गेलो होतो. त्या दिवशी झाकीरकाका हा नवोदित उमद्या अशा सारंगीवादकाबरोबर- दिलशादखांबरोबर वाजवणार होता. कार्यक्रमाच्या सूत्रानुसार आधी दिलशादखां येणार आणि नंतर उस्ताद झाकीर हुसेन येणार असं होतं. मी व रवीकाका विंगेत होतो. उस्तादजींनी निवेदकाला क्रम बदलायला सांगितला आणि म्हणाले, मी आधी स्टेजवर येतो व मी दिलशादला इंट्रोड्यूस करतो. त्याच्या नावाचा पुकारा झाल्यानंतर, रंगमंचावर पाऊल ठेवण्यापूर्वी त्यानं त्याच्या चपला बाहेर काढून ठेवल्या. मग रंगमंचावर शिरला. सर्व रसिकांना नम्रपणे कमरेतून वाकून नमस्कार केला आणि मग त्याने दिलशादखांबद्दल छानसं वक्तव्य केलं, 'आज मी त्याच्याबरोबर पहिल्यांदा वाजवणार आहे' असं सांगून मग श्रोत्यांना टाळ्यांच्या गजरात दिलशादखांचं स्वागत करावं अशी विनंती केली. एखाद्या ज्येष्ठाने नवोदिताचा इतका मोठा सन्मान कधी केला नसेल. उस्ताद झाकीरजींची आणखी एक छान गोष्ट आहे. जगभर भ्रमंती करणारा हा महान कलावंत जवळचं अंतर लोकल ट्रेनने किंवा रेल्वेने कापतो. कल्याण, डोंबिवलीला जर कार्यक्रम असेल तर त्याचा रवीकाकाला फोन येतो व त्याला तो सांगतो, अमक्या दिवशी कार्यक्रम आहे, मला तू रेल्वेने घेऊन जा. मग रवीकाकाचा एक रेल्वेतला मित्र, व रवीकाकाचं शेपूट असल्यासारखा मी त्याला घ्यायला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर जातो आणि ट्रेनने घेऊन गंतव्य स्थळी पोहोचवतो. त्याला स्टेशनवर बघून अनेकांचा विश्वास बसत नाही. पण, तो अगदी सहजपणे स्टेशनवर असणारे हमाल, तिकिट कलेक्टर, प्रवाशांच्यात मिसळतो, प्रत्येकाला हवे तितके फोटो काढू देतो. आता तो एक काळजी घेतो, बाहेर कुठेही काहीही खात नाही. त्याचा पिण्याच्या पाण्याचा एक ठराविक ब्रँड आहे, तेच पाणी तो पितो, ते मिळालं नाही तर तो पाणी पिणार नाही. त्याची आणखी एक सवय आहे, त्याचा कार्यक्रम जिथं असेल तिथं, तो कार्यक्रमाच्या काही तास आधी जातो. मला आठवतंय, माझ्या मावसभावानं संतोष जोशी, त्याचे पार्टनर्स प्रियांका साठे आणि अभिजित सावंत यांनी झाकीर हुसेन आणि शंकर महादेवन यांचा ठाण्यात एक कार्यक्रम आयोजित केला होता. मी सुरुवातीपासून त्यांच्याबरोबर होतो. शंकर महादेवनने झाकीरजी कधी येणार आहेत, याची विचारणा केली आणि त्याप्रमाणे तो झाकीरकाका त्या कार्यक्रमाला पोहोचण्याच्या काही मिनिटे आधी तिथं पोहोचला.

(पान ५ वर )



# तबल्याचे उस्ताद: झाकीरभाई

**हिंदुस्थानी वाद्य तबल्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान, प्रसिद्धी, प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये उस्ताद झाकीर हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे. जगातील अनेक देशांमध्ये हे भारतीय वाद्य पोहोचवण्याचे अनमोल कार्य झाकीरभाईंनी केले आहे. झाकीरभाईंचे नाव ऐकले की आदराने मान आपोआप झुकते. त्यांचा स्वभाव अत्यंत विनम्र होता. इतर कलाकारांविषयी त्यांच्या मनामध्ये सदैव विनम्र भाव असायचा. झाकीरभाई म्हणजे संगीत क्षेत्राचे दैवतच. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली!**

श्रध्दांजली...

डॉ. अनिल सर्जे, सोलापूर
भ्र. ९८२३९१९५९१

प्रत्येक तबलावादकाच्या जीवनामध्ये झाकीरभाईंना हृदयात स्थान आहे. कोणत्याही मंदिराचे शिखर पाहिले की मान आपोआप झुकते. झाकीरभाईंचे नुसते नाव निघाले की आम्ही त्यांच्यासमोर नतमस्तक होतो. अशा महान कलाकाराचा तबला ऐकायला आम्ही सारे सदैव उत्सुक असतो. १९८९ मध्ये त्यांचे तबलावादन पंढरपूरात आयोजित केले होते. त्यावेळी सोलापूरच्या हरीभाई देवकरण प्रशालेत नववीत शिकत होतो. तबला ऐकण्यासाठी गुरुवर्य पं. भीमराव कनकधर यांच्या समवेत गेलो. कार्यक्रमापूर्वी झाकीरभाईंची भेट झाली. भेटीमध्ये संयोजक खडके बंधू यांनी झाकीरभाईंना सांगितले, झाकीरभाई इस बच्चेका तबला सुनो। झाकीरभाई त्या कार्यक्रमाचे मुख्य कलावंत होते. मी त्यांचा तबला ऐकायला गेलो होतो. खडके बंधूंनी ओळख करून देताना सहज सांगितले. झाकीरभाई अभी सुनेंगे असे म्हणून रसिकांमध्ये जाऊन पहिल्या रांगेत बसले. मला आश्चर्याचा धक्का बसला. या कार्यक्रमात तबला वाजवण्याची कोणत्याही प्रकारची मानसिकता नव्हती. तसा विचार मनात येण्याचे कसलेच कारण नव्हते. त्यांचा तबला ऐकणे हा एकच विषय होता. झाकिरभाई खाली बसल्यानंतर गुरुवर्य भिमराव दादांची आज्ञा झाली, जा सोलो वाजव. गुरूंची आज्ञा शिरसावंद मानली. त्यांचे आशीर्वाद घेतले. स्टेजवर गेलो. हैदराबादहून ज्येष्ठ गुरुबंधू धनवंत सिंदखेडे तबला ऐकायला आले होते. त्यांना भीमराव दादांनी लहरा वाजवण्याची आज्ञा केली. आम्ही दोघे यापूर्वी कधीच सराव केलेला नव्हता. सुमारे दहा मिनिटे स्वतंत्र तबलावादन करण्याची सेवा घडली. पहिल्या कायद्यालाच टाळ्यांचा कडकडाट झाला. सभागृहातील सर्व रसिक भारावून गेले. झाकीरभाई खूप मनापासून दाद देत होते. तबलावादनानंतर झाकीरभाई व्यासपीठावर आले. संयोजकांनी सत्काराचे साहित्य आणले. झाकीरभाईंनी अत्यंत आत्मीयतेने सत्कार केला. त्यांचा कार्यक्रम ऐकण्याचा मनस्वी आनंद घेतला. कार्यक्रम संपल्यानंतर पंढरपूर सोडेपर्यंत झाकीरभाईंनी मला सोडले नाही. प्रत्येक क्षण त्यांच्या समवेत घालवण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्यांचे शेकडो चाहते त्यांच्याजवळ यायचे. फोटो काढायचे. या शेकडो फोटोमध्ये झाकीर भाईंनी मला जवळच थांबवले होते. माझी खूप आत्मीयतेने चौकशी केली. खूप गप्पा मारल्या. भोजनही त्यांच्या समवेतच झाले. त्यावेळी खिशातून एक रुपया काढून माझ्या हातात ठेवला. तुला ९९ रुपये घ्यायचे आहेत. असा आज्ञारुपी आशीर्वाद दिला. तो एक रुपया माझ्यासाठी महालक्ष्मीचा प्रसाद आणि सरस्वतीचा आशीर्वाद होता. थोर प्रवचनकार वा. ना. उत्पात यांनी त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले होते. सोलापूर, पंढरपुरात आल्यानंतर किंवा बाहेर कुठे खडके बंधू त्यांना भेटल्यानंतर ते माझी आवर्जून चौकशी करीत. खडके बंधू भेटले की आवर्जून सांगत झाकीरभाईंनी तुझी आठवण काढली. हिंदुस्थानी वाद्य तबल्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान, प्रसिद्धी, प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये उस्ताद झाकीर हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचा तबला ऐकून अनेकजण तबलावादनाकडे वळले. त्यामुळे संगीत क्षेत्रात सर्वात जास्त कलाकार तबलावादक आहेत. पारंपारिक तबल्याला त्यांनी आधुनिकतेची जोड दिली. ज्याला संगीत किंवा तबल्याविषयी काहीही माहिती नाही त्यालाही मान डोलवायला लावण्याची ताकद झाकीरभाईंच्या तबला वादनात होती. हिंदू देवतांविषयी त्यांच्या मनात अत्यंत आदराची भावना होती. सरस्वती मातेचे स्मरण सदैव करीत. ते तबलावादन करताना तबल्याशी एकरूप होत असत. त्यांचे वादन ऐकून मंत्रमुग्धतेचा अनुभव येणार नाही असा रसिक मिळणे अशक्य आहे. अशा या महान कलावंताला भावपूर्ण श्रद्धांजली!

# वलयांकितांच्या सहवासात...




(पान ४ वरून) डोंबिवलीला एम.आय.डी. सी. मैदानात झाकीरकाकाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. आम्ही त्याला ट्रेनने घेऊन आलो. कल्याण स्टेशनवर उतरल्यावर आयोजकांनी मोटारीनं डोंबिवलीला नेलं. कार्यक्रम रात्री साडे-सात आठच्या दरम्यान सुरू होणार होता. आम्ही मैदानात साडेपाचच्या सुमारास पोहोचलो. मोटारीतून स्वत:च्या तबल्याचं कीट त्यानं स्वत: उचललं आणि थेट स्टेजवर गेला. नंतर दीड तासभर झाकीरकाका स्वत:ची वाद्ये लावत होता, ती आधी स्वत:ला कशी ऐकू येत आहेत ते तपासून घेत होता.

आमच्या कॉलेजमध्ये प्राचार्य दिनेश पंजवानी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गौरव दिवस हा एक कार्यक्रम सुरू केला. पहिल्या वर्षी आम्ही रवींद्र जैन यांना बोलावलं. दुसऱ्या वर्षी बावीस जानेवारी २००२ रोजी ते व मी बोलत होतो, तेव्हा त्यांना मी विचारलं की, 'आपण यावर्षीचा गौरव पुरस्कार उस्ताद झाकीर हुसेन यांना देऊ या का?' सरांनी माझ्याकडे आश्चर्यानं बघितलं व विचारलं, तू जानता है उनको? एवढ्या थोड्या अवधीत ते येतील का? मी आत्मविश्वासानं, हो, मी ओळखतो आणि तो येईल. सर थोडे वैतागले, अरे, इतने बडे आदमी को तू अरे तुरे क्या करता है? अकल नहीं है. मी सरांना म्हणालो, तो माझ्या काकाचा मित्र आहे. सुदैवानं झाकीरकाकानं गौरव पुरस्कार स्वीकारायचं ठरवलं. आम्ही झाकीरजींच्या आगमनानिमित्त एक सुंदरसा कार्यक्रम आखला. कार्यक्रम झाल्यानंतर जेव्हा मी या सगळ्या पोरांना घेऊन प्राचार्यांच्या कार्यालयात गेलो, तेव्हा हा जागतिक कीर्तिचा पद्मभूषण तबलानवाज विवेकला बघून म्हणाला, अरे, आओ उस्ताद आओ. विवेकला त्यांनी प्रेमानं जवळ घेतलं, पाठीवर थाप मारली, कोणाकडे शिकतोस असं विचारल्यावर त्यानं पैठणकरांकडे शिकतो असं म्हटल्यावर त्यानं पटकन विचारलं, त्यांच्याकडे तिरखवांसाहेबांचा तबला आहे, तो त्यांचे गुरू पं. नारायणबुवा जोशींकडून आला आहे. सचिन मुळ्येची आई कांचन मुळ्ये, ह्या पं. गजाननबुवा जोशी यांची कन्या. मी त्यांची ओळख करून दिल्यावर झाकीरकाकानं त्यांना खाली वाकून नमस्कार केला. पं. गजाननबुवांनी अब्बाजींना म्हणजे उस्ताद अल्लारखांसाहेबांना त्यांच्या मुंबईतील प्रारंभीच्या काळात जी मदत केली होती, ती जाणून घेऊन त्याने तो नमस्कार केला. हे सर्व मला माहिती असण्याचं काही कारण नव्हतं, झाकीरकाकानं सर्वांसमोर ही वस्तुस्थिती सांगितली तेव्हा ते कळलं. याच कार्यक्रमाच्या वेळी एक अविस्मरणीय घटना घडली. झाकीरकाकाचा सत्कार झाला, त्या सत्काराला उत्तर द्यायला तो जेव्हा उभा राहिला तेव्हा समोर असलेले तीन साडेतीन हजार विद्यार्थी अगदी शांत बसले होते. झाकीरकाका बोलायला जेव्हा उठला, तेव्हा दूरवरच्या मशिदीतून अज़ान ऐकू येऊ लागला. झाकीरकाका स्टेजवर शांत उभा राहिला. स्टेज शांत, श्रोते शांत, आसमंत शांत आणि दूरवर ईश्वराची केली जाणारी आर्त आळवणी. साऱ्यांचा श्वास एक झाला होता. अजान संपला आणि झाकीरकाकानं बोलण्यापूर्वी एक दीर्घ श्वास घेतला, तो श्वास संवेदनशील माईकनं पकडला, त्याचा आवाज सर्वदूर पसरला. समोरून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. साडे तीन हजार तरुण मनं आणि त्या मनांवर नकळत अधिराज्य करणारा एक महान कलावंत यांच्यातलं ते अद्वैत अद्भूत असंच होतं.मी रवीकाकाबरोबर झाकीरकाकाच्या घरी अधून मधून जात असे. अम्मीच्या निधनानंतर आमचं जाणं येणं जरासं कमी झालं. एकदा अब्बाजींच्या बरसीच्या पूर्वी जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही नेपीअन सी रोडवर त्याच्या घरी गेलो होतो. झाकीरकाका जेवायला ज्या टेबलावर बसायचा त्याच्या खुर्चीच्या मागच्या भिंतीवर लता मंगेशकरांनी सही करून दिलेला फोटो लावलेला होता. त्याखाली अब्बाजी, अम्मी आणि तरुण हसऱ्या चेहऱ्याच्या झाकीर असा एक छान फोटो होता, त्याच्या खाली झाकीरकाकाच्या खांद्यावर हात टाकलेला पु. ल. देशपांडे यांचा फोटो होता. मी त्याला प्रश्न विचारला, अब्बाजी आणि अम्मीबरोबरचा फोटो लावलाय हे कळलं. पण लता मंगेशकरांचा आणि पु. लं. बरोबरचा फोटो का? तो उत्तरला, लताजी तर साक्षात सरस्वतीचं रूप आहेत आणि पु.लं. सारखा रसिक आणि कलाकार कुठेही सापडणार नाही. मला अचानक आठवण झाली, आमच्या कर्जत गावात वनश्री ज्ञानदीप मंडळ होतं. त्यांनी पु. ल. देशपांडे व सुनीता देशपांडे यांच्या आरती प्रभूंची कविता या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. आरती प्रभू त्यांच्या अत्यंत विपन्नावस्थेच्या काळात कर्जतला कावसजीशेट काटपटपिटीया यांच्या चाळीत अक्षरश: आठ बाय दहाच्या खोलीत राहात होते. कार्यक्रम झाला व नंतर दुसऱ्या दिवशी पु.ल. व सुनीताबाई आमच्या घरी जेवायला आले. त्यानंतर दोन तीन दिवसांनी त्यांचं माझ्या काकांना- मनोहर आरेकर यांना एक पत्र आलं. त्यात त्यांनी कर्जतच्या एकूण संयोजनाबद्दल आभार मानले आणि नंतर त्यात लिहिलं की, 'कालच बालगंधर्वला झाकीरचा तबला ऐकला आणि त्यानंतर असं वाटलं की झाकीर जे वाद्य वाजवतो तो तबला.' मी ती आठवण झाकीरकाकाला सांगितली. त्यानं मला पु.लं.चं वाक्य इंग्रजीत भाषांतरित करायला सांगितलं. मी म्हणालो, P. L. says Zakir is the definition of Tabla. त्यानं पुन्हा एकदा ते वाक्य माझ्याकडून म्हणून घेतलं. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले होते. तो कधीही त्याच्या भावनांचं प्रदर्शन करत नाही. त्या क्षणी तसं घडलं खरं.

कित्येकदा मला असं वाटतं, उद्या म्हातारा झाल्यावर माझ्या नातवंडांना या गोष्टी सांगत असेन, नातवंडं तोंडात बोटं घालून त्या गोष्टी ऐकत असतील. नंतर म्हणतील, आजोबा. किती थापा मारता. मग मी हसेन, आणि मनातल्या मनात म्हणेन, बाळांनो, खरं आहे. पृथ्वीवर गंधर्व येऊन गेले यावर सामान्यांचा विश्वास बसत नाही. ज्यांचं भाग्य होतं त्यांना ते गंधर्व पाहता आले. मी भाग्यवान आहे, मी या गंधर्वाला पाहिलं.

# स्वप्नील जोशी आता डॅशिंग अंदाजात झळकणार

मराठी सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक म्हणजे स्वप्नील जोशी. स्वप्नीलने आजवर अनेक रोमँटिक चित्रपटात काम केलं आहे. त्यामुळे त्याला मराठी सिनेसृष्टीतील चॉकलेट हिरो म्हणून ओळखलं जात. पण, आता लवकरच स्वप्नील जोशी कधीही न पाहिलेल्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. अभिनेता स्वप्नील जोशी आगामी 'जिलबी' चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात त्याच्या सोबतीला प्रसाद ओक आणि शिवानी सुर्वे पाहायला मिळणार आहे. याच चित्रपटात स्वप्नील विजय करमरकर या डॅशिंग पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचं दमदार मोशन पोस्टर नुकतंच प्रदर्शित झालं. आनंद पंडित मोशन पिक्चर्स निर्मित ही खुमासदार 'जिलबी' १७ जानेवारीला आपल्या मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे. चित्रपटाचं दिग्दर्शन नितीन कांबळे यांनी केलं आहे. 'जिलबी' चित्रपटातील आपल्या भूमिकेबद्दल स्वप्नील जोशी म्हणाला, आपला पोलिसी खाक्या दाखवत चोख कामगिरी बजावणारा हा पोलीस अधिकारी आहे. माझ्या आजवरच्या भूमिकांपेक्षा वेगळी भूमिका मला करायला मिळाल्याचा आनंद आहे. विशेष म्हणजे पोलिसांचा अंदाज, त्यांच्या जबरदस्त व्यक्तिमत्वाचा लहेजा हे सगळं करण्यात एक वेगळीच मजा आली. पुढे स्वप्नील म्हणाला की, प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करणारा 'जिलबी' हा चित्रपट आहे. भूमिका कोणत्याही प्रकारची असली, तरी ती चांगली व्हावी यासाठी कलाकारांना कष्ट घ्यावे लागतात. एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकून पडायचं नसल्याने ही वेगळी भूमिका स्वीकारल्याचं स्वप्नील सांगतो. 'जिलबी' हा चित्रपटसुद्धा वेगवेगळ्या चवींचा आस्वाद आपल्याला देणार आहे. ज्यात विविध व्यक्तिरेखा, त्यांचे स्वभाव वैशिष्ट्ये आणि सोबत रहस्याचा थरार असं बरंच काही आहे. 'जिलबी' चित्रपटाची कथा-पटकथा- संवाद मच्छिंद्र बुगडे यांचे आहेत. आनंद पंडित आणि रुपा पंडित हे चित्रपटाचे निर्माते आहेत. क्रिएटिव्ह दिग्दर्शन आणि सहनिर्मितीची जबाबदारी राहुल व्ही. दुबे यांनी सांभाळली आहे. छायांकन गणेश उतेकर तर कलादिग्दर्शन कौशल सिंग यांचे आहे. कार्यकारी निर्माते महेश चाबुकस्वार आहेत.



# श्रुती मराठेची बॉलीवूडमध्ये एन्ट्री

मराठमोळी अभिनेत्री श्रुती मराठेने मालिकांसह चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. याशिवाय अलीकडेच तिने साऊथ सिनेमात देखील काम केले आहे. 'देवरा' या साऊथ सिनेमात ती महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. सोशल मीडियावर देखील ती सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. नुकतेच तिने इनस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत तिच्या बॉलीवूड चित्रपटातील एन्ट्रीची माहिती चाहत्यांना दिली आहे. श्रुती मराठे आता लवकरच बॉलिवूड सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'वनवास' या नाना पाटेकरांच्या सिनेमात श्रुतीची वर्णी लागली आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ज्यात तिची झलक पाहायला मिळत आहे. श्रुतीने तिच्या इन्स्टाग्रामवरुन सिनेमाचा ट्रेलर शेअर केला आहे. ज्यानंतर तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. अनिल शर्मा दिग्दर्शित हा चित्रपट २० डिसेंबरला रिलीज होणार आहे. या ट्रेलरमध्ये आपुलकीच्या शोधात असलेल्या भावनिक कथेची झलक दिसते. वनवास सिनेमात नाना पाटेकर आणि अभिनेता उत्कर्ष शर्मा मुख्य भूमिकेत आहेत. अनिल शर्मा यांना गदर: एक प्रेम कथा, गदर २ यांसारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाते. मुलांचे संगोपन करणे हे पालकांचे कर्तव्य आहे आणि पालकांची काळजी घेणे मुलांचे कर्तव्य आहे, हे ट्रेलरमध्ये दाखवले आहे. ही कथा प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आहे.



# 'सैराट' फेम रिंकू राजगुरुने केली नव्या चित्रपटाची घोषणा!



अभिनेत्री 'सैराट' या चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत प्रेक्षकांना तिच्या अभिनयाने वेड लावणारी अभिनेत्री म्हणजे रिंकू राजगुरू. 'सैराट' चित्रपटातून अभिनेत्रीला मोठी लोकप्रियता मिळाली. त्यानंतर २०१९ ला प्रदर्शित झालेला 'कागर', '२०० हल्ला हो' (२०२१), 'अनकहीं कहाँनिया' (२०२१), 'झुंड' (२०२२), 'झिम्मा २' (२०२३) अशा उत्तमोत्तम चित्रपटांत काम करत रिंकू राजगुरूने स्वत:च्या अभिनयाची छाप सोडली आहे. आता अभिनेत्री एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'जिजाई' असे या चित्रपटाचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाची चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळाले होते. नुकताच जिजाईचा मुहूर्त पार पडल्याचे सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेल्या फोटोंमधून दिसत आहे. 'जिजाई' चित्रपटाच्या शूटिंगला लवकरच सुरुवात होणार आहे. नुकताच या चित्रपटाच्या मुहूर्ताचा कार्यक्रम पार पडला. झी स्टुडिओज व कोकोनट फिल्म्स यांनी सोशल मीडियावर याबद्दल पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये रिंकू राजगुरू हातात जिजाई चित्रपटाच्या मुहूर्ताची पाटी घेऊन उभी असलेली दिसत आहे. हा फोटो शेअर करत झी स्टुडिओजने कॅप्शनमध्ये लिहिले, शुभारंभ झाला, आता आपला आशीर्वाद असू द्या! झी स्टुडिओज व कोकोनट फिल्म घेऊन येत आहेत रिंकू राजगुरूची प्रमुख भूमिका असलेला, नवा कोरा मराठी सिनेमा 'जिजाई.' या पोस्टमध्ये रिंकूला टॅग केले आहे. अभिनेत्रीने ही पोस्ट तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केली आहे. नवोदित दिग्दर्शक तृशांत इंगळे दिग्दर्शित 'जिजाई' चित्रपटात रिंकू राजगुरू प्रमुख भूमिकेत दिसणार आहे, तर अपूर्वा शालीग्राम चित्रपटाच्या डीओपी आहेत. कपाळी चंद्रकोर लावलेली रिंकू या चित्रपटात एका वेगळ्याच अंदाजात दिसणार आहे. 'सैराट'च्या यशानंतर रिंकू राजगुरू आणि झी स्टुडिओज यांच्यात एक वेगळे नाते निर्माण झाले असल्याचे पाहायला मिळत आहे. आता पुन्हा एकदा 'जिजाई'च्या माध्यमातून लवकरच ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. झी स्टुडिओजचे बवेश जानवलेकर म्हणतात, झी स्टुडिओजने नेहमीप्रमाणे नवोदित कलाकारांना आणि दिग्दर्शकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. झी स्टुडिओजने प्रेक्षकांसाठी कायमच दर्जेदार आणि वेगळ्या आशयाचे चित्रपट सादर केले आहेत. 'जिजाई' हा त्याच परंपरेचा भाग आहे. दरम्यान, रिंकू राजगुरू चित्रपटांबरोबरच सोशल मीडियावरदेखील सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. तिने शेअर केलेल्या फोटोंना चाहत्यांची मोठी पसंती मिळताना दिसते. आता रिंकूच्या या नवीन चित्रपटाची प्रेक्षकांना उत्सुकता लागलेली पाहायला मिळत आहे.



# धनुष आणि ऐश्वर्या रजनीकांतच्या घटस्फोटावर न्यायालयाचा निर्णय

चित्रपट दिग्दर्शक कस्तुरीराजाचा मुलगा धनुष आणि साऊथ सुपरस्टार रजनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या यांचा विवाह १८ नोव्हेंबर २००४ रोजी झाला होता. दोघांना दोन मुलगे आहेत. तब्बल १८ वर्षांनंतर दोघांनी वेगळे होण्याची घोषणा केली होती. यानंतर त्यांनी कौटुंबिक न्यायालयात धाव घेत परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अपील केले. २१ नोव्हेंबर रोजी दोन्ही कुटुंबीय न्यायालयाच्या न्यायाधीश सुभादेवी यांनी धनुष आणि ऐश्वर्याला त्यांच्या निर्णयाबद्दल विचारले. त्यांनी विभक्त होण्याची इच्छा व्यक्त केली, त्यानंतर न्यायाधीश सुभादेवी यांनी धनुष आणि ऐश्वर्या रजनीकांत यांच्या घटस्फोटाला मंजुरी दिली आहे. अशाप्रकारे अभिनेता-दिग्दर्शक धनुष आणि दिग्दर्शक ऐश्वर्या रजनीकांत आता अधिकृतपणे वेगळे झाले आहेत. ऐश्वर्या आणि धनुषचे २००४ मध्ये चेन्नईमध्ये भव्य लग्न झाले होते. ऐश्वर्या रजनीकांत आणि लता रजनीकांत यांची मुलगी आहे. धनुष हा दिग्दर्शक कस्तुरी राजा आणि विजयालक्ष्मी यांचा मुलगा आहे. १७ जानेवारी २०२२ रोजी, धनुष आणि ऐश्वर्याने एक संयुक्त निवेदन शेअर करून त्यांच्या विभक्त होण्याच्या मार्गाची घोषणा केली. ते म्हणाले, 'मित्र, जोडपे, आई-वडील आणि एकमेकांचे शुभचिंतक म्हणून १८ वर्षे एकत्र राहिलो. हा प्रवास समजूतदारपणाचा, समायोजनाचा आणि अनुकूलनाचा होता. आज आपण अशा ठिकाणी उभे आहोत जिथे आपले मार्ग वेगळे झाले आहेत. आम्ही एक जोडपे म्हणून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे आणि आम्हाला अधिक चांगल्यासाठी व्यक्ती म्हणून समजून घेण्यासाठी वेळ काढला आहे. धनुष आणि ऐश्वर्याने त्यांच्या पोस्टमध्ये पुढे लिहिले की, 'कृपया आमच्या निर्णयाचा आदर करा आणि आम्हाला ते हाताळण्यासाठी गोपनीयता द्या.' यात्रा आणि लिंग या दोन मुलांचे पालक असलेले धनुष आणि ऐश्वर्या विभक्त झाल्यानंतरही त्यांच्या मुलांचे संगोपन करत राहतील.

# भंवर सिंग 'या' अभिनेत्रीसोबत करणार बॉलिवूड पदार्पण



'पुष्पा २'ची सध्या चांगलीच हवा आहे. 'पुष्पा २'ची गेल्या काही महिन्यांत जबरजस्त क्रेझ बघायला मिळाली. सिनेमातील प्रमुख कलाकार म्हणजे अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदाना. या दोघांशिवाय सिनेमातील आणखी एका कलाकाराची चर्चा आहे ती म्हणजे 'भंवर सिंग शेखावत'ची भूमिका साकारणारा अभिनेता फहाद फासिल. फहाद लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. त्याविषयीची अपडेट समोर आलीय.

फहाद फासिल हा साउथमधील प्रसिद्ध अभिनेता. 'जोजी', 'आवेशम', 'कुंबलंगी नाईट्स' असे फहादचे अनेक सिनेमे गाजले आहेत. पिपिंगमूनने दिलेल्या रिपोर्टनुसार फहाद आता साउथ सिनेमे गाजवून बॉलिवूड पदार्पणासाठी सज्ज आहे.

इम्तियाज अलीच्या आगामी रोमँटिक सिनेमात फहाद झळकणार आहे.

विशेष म्हणजे या सिनेमात फहादसोबत अभिनेत्री तृप्ती डिमरी झळकणार आहे. त्यामुळे फहाद-तृप्ती या वेगळ्या जोडीचा बॉलिवूड रोमान्स बघायला सर्व उत्सुक असतील. फहादने २०२१ साली आलेल्या 'पुष्पा' सिनेमात आयपीएस भंवर सिंग शेखावतची भूमिका साकारली. सिनेमाच्या शेवटच्या अर्ध्या तासात आलेल्या फहादने उत्कृष्ट अभिनय करुन सर्वांचं प्रेम मिळवलं. आता फहाद 'पुष्पा २'मध्ये अल्लू अर्जुनसमोर मुख्य खलनायक म्हणून उभा राहतोय. ट्रेलरमध्ये दिसलेला फहादचा अभिनय लक्षवेधी ठरला. त्यामुळे आता सिनेमात फहाद काय कमाल दाखवतो, हे उद्या सिनेमा रिलीज झाल्यावर कळेल.



# शिवरायांवरील बिग बजेट चित्रपटात ऋषभ शेट्टी



साऊथच्या कांतारा चित्रपटामुळे संपूर्ण देशातील घराघरात पोहोचलेला कानडी अभिनेता ऋषभ शेट्टी आता आणखी एका बिग बजेट चित्रपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. संपूर्ण भारताचं आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरीत्रावर आधारीत पॅन इंडिया चित्रपट साकारला जात असून ऋषभ त्यामध्ये शिवरायांची भूमिका साकारत आहेत. ऋषभने स्वतःच याबाबतची माहिती दिली आहे. त्याने त्याचा या चित्रपटातील फर्स्ट लूक देखील सादर केला आहे. या चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरसह चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख देखील जाहीर करण्यात आली आहे. २१ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित करण्याची योजना निर्मात्यांनी आखली आहे. हा चित्रपट हिंदीसह विविध भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. संदीप सिंह हे या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहेत. चित्रपटाचं पहिलं पोस्टर सादर करताना ऋषभने त्याच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की आपला सन्मान आणि विशेषाधिकार, भारतातील महान योद्धा व महान राजाची गाथा प्रस्तुत करत आहोत. 'दी प्राइड ऑफ भारत- छत्रपती शिवाजी महाराज' हा केवळ एक चित्रपट नाही. हा एका योद्ध्याच्या सन्मानार्थ केलेला युद्धघोष आहे. ज्याने अनेक वादळं पायदळी तुडवतं हिंदवी स्वराज्य साकारलं आणि शक्तीशाली मुघल साम्राज्याला आव्हान दिलं. ज्या राजाने आपल्याला मोठा वारसा दिला ही त्याची गोष्ट २७ जानेवारी २०२७ रोजी जगभरात प्रदर्शित केली जाईल. दिग्गज गायिका आशा भोसले यांची नात जनाई भोसले लवकरच मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. ती या ऐतिहासिक चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. जनाई ही या चित्रपटात ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी सईबाई भोसले यांची भूमिका साकारणार आहे. जनाई ही या चित्रपटात ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी सईबाई भोसले यांची भूमिका साकारणार आहे. जनाई ही आशा भोसले यांचे पूत्र आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिचे इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्स आहेत. उत्तम गायिका असलेली जनाई आता अभिनय करताना रुपेरी पडद्यावर दिसणार आहे.



# उस्ताद झाकीर हुसेनः माझे भाईसाब

**आज काय बोलू, आज तबला फुटला, त्याच्यातले बोलच संपले. असा कलाकार झाला नाही, होणे नाही. परमेश्वर अशा महात्म्यांचे साचे शेकडो वर्षांतून एकदाच बनवितो व लगेच फोडून टाकतो. सरस्वती आज त्याचे स्वागत करायला तयार असेल. स्वर्गात आज रांगोळ्या घालून, धूपदीप लावून, फुले उधळून भाईसाबचे स्वागत होईल. पण पृथ्वीतलावर मात्र अश्रुंना आवर घालता येणार नाही.**

आठवण

संजीव शेलार

२०१२ साली औरंगाबाद येथे स्वरझंकार कार्यक्रम सुरू झाला. त्याच्यात अनेक मैफिली होत असे. तीन दिवसाचा कार्यक्रम असायचा आणि दरवर्षी व्हायचा. त्यावेळेला २०१६ मध्ये एका कार्यक्रमात पंडित शिवकुमार शर्मा आणि उस्ताद झाकीरभाई हुसेन यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या आयोजकांपैकी एक या नात्याने या दोन्ही कलाकारांचा अगदी जवळ परिचय झाला. त्यांची पहिली मैफील सवाई गंधर्व महोत्सवात १९८३ साली अनुभवली होती. अत्यंत तरुण वयात असलेला हा उस्ताद नाव मोठे करेल असे वाटले होते. त्यावेळेला त्याचं नाव मोठं झालं होतंच, पण पुढे हा महान कलाकार होईल हेच वाटले होते. आणि त्या तेव्हापासून या कलाकाराची आपली भेट व्हावी, ओळख व्हावी अशी एक सुप्त इच्छा होती. अगदी देव कधीतरी भेटावा अशी.

मी व माझे आयोजक मित्र औरंगाबादला सकाळी पहाटे त्यांना आणायला विमानतळावर गेलो. झाकीर भाईंचे आगमन झाले ते अगदी साध्या जीन पॅन्ट व शर्टमध्ये. त्यांना पाहून मी त्यांच्या पाया पडायला लागलो तर त्यांनी मला अर्ध्यातच थांबवले, माझे दोन्ही हात त्यांच्या हातात घेतले व म्हणाले, आप कैसे हो? बहुत इंतजार किया क्या? हे ऐकून मी चक्क उडालोच आणि उस्तादजी ऐवजी मी चुकून पंडितजी म्हणून त्यांना संबोधले व म्हणालो, पंडितजी आप का सफर कैसा रहा? पंडितजी कौन है? मी कानाला हात लावला व म्हणालो, उस्तादजी उस्तादजी, यहा उस्तादजी कौन है? मै सिर्फ झाकीर हुँ, झाकीर बोलीये. भाईसाब आप बडे है, मै आपका नाम ऐसा नही ले सकता आपने भाईसाब कहा है, ये सबसे अच्छा है. सब झाकिरभाई बोलते है लेकिन आपने जो भाईसाब करके पुकारा तो अच्छा लगा!



अर्ध्याच मिनिटांमध्ये या माणसाने मला एकदम घरचा माणूस भेटावा तसा आपलंसं केलं होतं. आता विमानतळावरील गर्दीला समजले होते की हे झाकीरभाई होते आणि त्यांच्यामध्ये कुजबूज सुरू झाली होती. आम्ही गाडी तयार ठेवलीच होती. त्यांना आम्ही लगेच गाडीत बसवले, सामान ठेवले व लगेचच निघालो.

Again, I beg to differ from you, आज लोग कहते है की हमने तबला पॉप्युलर किया, लेकिन इसके पहले हमारे बुजुर्गोंने इतना काम करके रखा था कि हम उनके रास्ते से सिर्फ चल रहे है और तबला अपने आप पॉप्युलर होते जा रहा है. अब्बाजी (उस्ताद अल्लारखा), सामता प्रसादजी, अमीर हुसेन खाँ साहब, किशन महाराजजी, ये लोगो ने क्या काम करके रखा है. हम उन्होने सिखाया हुआ ही बजाते है. उन्होने फाउंडेशन करके रखा है और लोग हमे क्रेडिट दे रहे है.

आपल्या आधीच्या पिढीबरोबर असलेला नितांत आदर व आपल्या बरोबरच्या पिढीचाही तितकाच सन्मान ठेवणाऱ्या या कलाकाराचे हे शब्द ऐकून आम्ही अक्षरशः भारावून गेलो. त्यांच्याविषयी जनसामान्याचे असलेले मत त्यांना माहित असेलच पण झाकीरभाई स्वतःला तबल्याच्या नकाशावर कुठे पाहतात हे पाहून आम्ही एखाद्या समोर नतमस्तक होणे म्हणजे काय याचाच अनुभव घेत होतो. इतरही गप्पा चालल्या होत्या व अशा मंत्रावलेल्या गप्पामध्ये ताज हॉटेल कधी आले समजलेच नाही.

ब्रेकफास्टच्या दरम्यान त्यांनी पंडित शिवकुमारजींची चौकशी केली. पंडितजी आदल्या दिवशीच आले होते. पत्रकार मित्रांनी झाकीरभाईंच्या मुलाखतीसाठी परवानगी मागितली होती. त्याप्रमाणे आम्ही भाईसाबना तशी विनंती केली. त्यावर ते एवढेच म्हणाले की हा कार्यक्रम पंडित शिवकुमार शर्माजींचा आहे. मी फक्त त्यांना साथसंगत देण्यासाठी आलो आहे. पत्रकार परिषद पंडितजी घेत असतील तरच मी त्यांच्या परिषदेनंतर मुलाखत देईल, अन्यथा नाही. कितीही झालं तरी ते बुजुर्ग. झाकीरभाईंचा पंडित शिवकुमार शर्मांविषयी असलेला आदर अनेक गोष्टीतून दिसत होता. किती हा आदर व नम्रता.

सर्वात मोठी कडी म्हणजे भाईसाबनी त्यांची वाद्ये त्यांनी स्वतः मंचावर आणली. आम्ही त्यांचा तबला व डग्गा घेत होतो पण त्यांनी त्यास निग्रहाने नकार दिला, व इतकेच म्हणाले की, ये मेरी सरस्वती है, उसे गुस्सा आयेगा, त्या क्षणी आम्ही पुरते गार झालो. आमच्यासाठी हा सुखद अनुभव होता. परंतु आपल्या वाद्यांकडे बघण्याचा त्यांच्या दृष्टिकोन कसा आहे हे समजले, आणि हा कलाकार एवढा महान का झाला ते कळाले.

दुसऱ्या दिवशी पहाटे सहा वाजता त्यांना विमानतळावर पोहोचवण्यासाठी मी ताजमध्ये गेलो. पाचच मिनिटात ते बाहेर आले. हॉटेलच्या काही कर्मचाऱ्यांना त्यांच्याबरोबर फोटो काढू दिले आणि आम्ही निघालो. यावेळी गाडीत आम्ही दोघेच होतो. आयोजकांचे प्रॉब्लेम, प्रायोजकांचे दबाव व यांच्यामुळे कलाकारांना होणारी व्यथा याविषयी ते भरभरून बोलत होते. नंतर त्यांची दोन वेळेला भेट झाली. एकदा त्यांच्या एकल वादनाला व दुसऱ्या वेळी, पंडित हरीहरन यांच्याबरोबर. दोन्ही वेळेला त्यांनी मला ओळखले.

भाईसाब करके मुझे बुलानेवाले आप संजीवजी हो ना?

अक्षरशः देवानी मला ओळखले, असे वाटले.

या वेळी विमानतळावर त्यांचे चेक इन मी करत होतो. त्यांचा भारतीय पासपोर्ट पाहून मी दचकलोच. कारण त्यांचे कुटुंबीय सॅन फ्रॅन्सिस्कोला रहातात, हे मला माहित होते, त्यामुळे त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व घेतले असावे, अशी माझी समजूत होती. पण भाईसाबने भारतीयत्व जपलेले होते. वयाच्या ७३ वर्षापर्यंत हा कलाकार वर्षातून १५०च्या वर मैफिली करतो, कारण उरलेला सगळा वेळ विमान प्रवास आणि रेकॉर्डिंगमध्ये जातो.

एकाच आठवड्यात दक्षिण अमेरिका खंडात ब्राझील व चिली, नंतर युरोपमध्ये ऑस्ट्रीयात, मग भारतात व लगेच परत दक्षिण अमेरिकेत अर्जेंटिनामध्ये, असा जगातील एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास हा कलाकार करतो. आपल्या आधीच्या पिढीविषयी असलेली कृतज्ञता, आपल्याबरोबरच्या पिढीविषयी असलेला आदर आणि पुढच्या पिढीविषयी असलेला विश्वास, त्याचबरोबर स्वतःला सरस्वतेची कृपा असलेला व सर्वसामान्य समजणारा हा कलाकार असामान्य का आहे याचे यथार्थ दर्शन या संगतीत झाले. विमान जायची वेळ होती परंतु एखादा घरचा माणूस परदेशात जाताना अश्रु भरून यावे तसे मन झाले होते. यावेळी मात्र त्यांचे न ऐकता पाया पडलो म्हणालो,

भाईसाब वापीस जरूर मिलेंगे, मुझे आप का इंतजार हमेशा रहेगा!

हा क्यूँ नही, जरूर मिलेंगे!

आज काय बोलू, आज तबला फुटला, त्याच्यातले बोलच संपले. असा कलाकार झाला नाही, होणे नाही. परमेश्वर अशा महात्म्यांचे साचे शेकडो वर्षांतून एकदाच बनवितो व लगेच मोडून टाकतो. सरस्वती आज त्याचे स्वागत करायला तयार असेल. स्वर्गात आज रांगोळ्या घालून, धूपदीप लावून, फुले उधळून भाईसाबचे स्वागत होईल. पण पृथ्वीतलावर मात्र अश्रुंना आवर घालता येणार नाही.